# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधीक्षक कार्यालय नागपूर

दिनांक २२/०५/२०२१ (शनिवार )

## नागपूर ग्रामीण व नागपूर शहर हद्दीतील चोरीच्या १४ मोटर सायकल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

मा. पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांचे आदेशाने पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात दिनांक २१/०५/२०२१ रोजी १५/००वा. दरम्यान स्थानिक गुन्हे शाखा, नागपुर ग्रामिण चे पथक सावनेर उपविभाग नागपूर ग्रामीण परिसरात नागपुर ग्रामिण हद्दीतुन चोरीस गेलेल्या दुचाकी गुन्हयाचे संबंधाने पेट्रोंलीग करीत असतांना मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे रेल्वे स्टेशन कळमेश्वर जवळ **एका विधीसंघर्षग्रस्त बालक** यास त्याचे **मित्र नामे अविनाश उर्फ ओपन प्रभाकर उघडे वय २४ वर्षे, रा. गॅस गोडावुन चे मागे ब्राम्हणी कळमेश्वर व चरण रामदास निमावत वय २७, रा.घोराड ता. कळमेश्वर** यांना पोस्टे कळमेश्वर अप.क्र. ३१७/२१ कलम ३७९ भादंवि चे गुन्हयात चोरी गेलेल्या दुचाकी सह ताब्यात घेवुन सखोल विचारपुस केली असता विधीसंघर्षग्रस्त बालकाने नागपूर शहर हद्दीतील वेगवेगळया पोलीस स्टेशन हद्दीतील भागातुन दुचाकी वाहने चोरून उपरोक्त नमुद त्याचे मित्रांना विक्री करीता दिल्याचे सांगितले. त्यावरून आरोपी नामे अविनाश उघडे व चरण निमावत यांना ताब्यात घेवुन त्यांचेकडुन एकुण १४ दुचाकी जप्त करण्यात आले आहे. मिळुन आलेल्या दुचाकी पैकी पो.स्टे. कळमेश्वर नागपुर ग्रामिण, पो.स्टे. कळमना, पो.स्टे. पारडी, पो.स्टे. अंबाझरी, नागपुर शहर हद्दीतील चोरीस गेलेली आहेत. आरोपी व मुद्देमाल पोलीस स्टेशन कळमेश्वर यांचे ताब्यात पुढील कायदेशीर कार्यवाही कामी देण्यात आलेले आहे. पुढील तपास पो.स्टे. कळमेश्वर करीत आहे.

मिळुन आलेला विधीसंघर्षग्रस्त बालक हा त्याचे जवळील जुन्या वाहनांचे चाबी चा उपयोग करून नागपुर शहर ग्रामिण हद्दीतुन वेगवेगळया कंपनिच्या दुचाकी चोरणारा असुन तो सदर चोरी केलेल्या दुचाकी विक्री करीता त्याचे मित्र अविनाश उघडे, रा. कळमेश्वर व चरण निमावत रा. घोराड यांचे कडे देत असे. मिळुन आलेले आरोपी व मुद्देमाल पुढील कायदेशीर कार्यवाही कामी पोलीस स्टेशन कळमेश्वर यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. पुढील तपास पो.स्टे. कळमेश्वर करीत आहे.

सदरची कार्यवाही नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणिकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांचे मार्गदर्शनात सहा. पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, जितेंद्र वैरागडे, पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र गौरखेडे, सहा. फौजदार जयप्रकाश शर्मा, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, महेश जाधव, दुर्गाप्रसाद पारडे, नापोशि राजेंद्र रेवतकर, रामा आडे, पोलीस शिपाई रोहन डाखोरे, महेश बिसने, अमृत किनगे, अमोल वाघ, अजिज दुधकनोज, चालक अमोल कुथे यांनी पार पाडली. **(फोटो सोबत संलग्न आहे)**

## —: विनयभंग :—

**१) पो.स्टे.सावनेर :—** अंतर्गत ०९ किमी दक्षिण कन्हैयाडोल येथे दिनांक ०४.०५.२०२१ चे १२.३० वा. दर. आरोपी लखन झाकणीकर रा. वडार मोहल्ला ब्राम्हणी ता. कळमेश्वर हा अल्पवयीन फिर्यादी मुलगी हिचा **वारंवार पाठलाग करून तिच्यावर प्रेम आहे असे सांगुन तिला लग्नाची मागणी घालुन पिडीत हिचा विनयभंग** केल्याचे तसेच **तिला शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी** दिल्याचे तोंडी रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट वरून आरोपी लखन झाकणीकर रा. वडार मोहल्ला ब्राम्हणी ता. कळमेश्वर यांचे विरुध्द पो.स्टे. कळमेश्वर येथे ३५४(ड),५०४,५०६ **भादवि,सहक.११,१२ पोक्सो** अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून आरोपीस अटक करण्याची तजवीज सुरू आहे. पुढील तपास महिला सहा. पोलीस निरीक्षक सावळा मो नं ९४०५५८८७१२ हे करीत आहे.

## —: चोरी (मोटार सायकल) :—

**१) पो.स्टे.सावनेर :—** अंतर्गत १५ किमी पूर्व अंतरावर डब्ल्युसीएल कॉलनी सदभावना पाटणसावंगी येथे दिनांक १७.०५.२०२१ चे २३.०० वा. ते दिनांक १८.०५.२०२१ चे ०६.०० वा. दरम्यान ऋषीकेश रामनारायण कश्यप वय २५ वर्ष रा. डब्ल्युसीएल कॉलनी सदभावना पाटनसावंगी यांनी आपली बजाज कंपनीची पल्सर **मोटार सायकल क्र.एमएच ४० बीवाय ३५७५ काळया रंगाची किंमती ९४,००० रू.** घरासमोर उभी करून ठेवली असता अज्ञात आरोपीतांनी चोरून नेल्याने सदर गुन्हा नोंद करण्यात आला. तपासादरम्यान सशंयीत १) परमविर राजेश सिंग वय २२ वर्षे, २) मुशरफ फकरे आलम खान वय २० वर्ष दोन्ही रा. पाटणसावंगी खदान यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी सदर मोटर सायकल चोरी केल्याची कबुली दिल्याने आरोपीचे ताब्यातुन मोटर सायकल जप्त करण्यात आली.

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट वरुन आरोपी १) परमविर राजेश सिंग वय २२ वर्षे, २) मुशरफ फकरे आलम खान वय २० वर्ष दोन्ही रा. पाटणसावंगी खदान यांचे विरुध्द पो.स्टे. सावनेर येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सहा.फौजदार राठोड मो.क्र. ९६२३७८७८५४ हे करीत आहे.

**२) पो.स्टे.काटोल :—** अंतर्गत १ किमी उत्तर अंतरावर उत्कर्ष पतसंस्था काटोल येथुन फिर्यादी नितीन मधुकर बावनकर वय ३६ वर्षे रा. दाढेरा ता. कळमेश्वर हा उत्कर्ष पतसंस्था काटोल येथे नोकरी करीत असुन तो डयूटी करीता गेला असता त्याने आपली **मो.सा.क्र. एमएच– ४० एक्स १३७६ कि. १५,००० रू. ची** झाडाखाली उभी करून ऑफीमध्ये गेलो व थोडया वेळानंतर बाहेर दिसुन आली नाही. आजूबाजूला शोध घेतला परंतु गाडी दिसली नाही तोंडी रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट वरुन अज्ञात आरोपी विरुध्द पो.स्टे. काटोल येथे कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोना सुनिल ठोंबरे मो.न. ९०११०२६४१४ हे करीत आहे.

## —: दुखापत :—

**१) पो.स्टे. कोंढाळी :—** अंतर्गत ०९ कि.मी. अंतरावरील मौजा जुनापाणी येथे फिर्यादी पंकज धनराज काळे वय २९ वर्षे रा. जुनापाणी हा दिनांक २१/०५/२०२१ रोजी घरी हजर असता आरोपी १) नाना ओहाके, २) संपत खोटे दोन्ही रा. चिचोली डांगे ता. आर्वी जिल्हा वर्धा हे टेम्पो घेवुन घराच्या समोर आले व फिर्यादी याला म्हटले की, **आमच्या बटईचे गहु व चना आम्ही घेवुन जातो असे फिर्यादी यास म्हटले असता फिर्यादी ने त्याना मनाई केली असता** आ.क्र. १ ने फिर्यादीच्या **डोक्यावर उजव्या डोळयाच्या भोवईवर विट मारून जखमी केल्याने** तसचे आ.क.२ ने त्याला **ढकल ढुकल करून दोघंनी शिवीगाळी करून झगडा भांडन करून मारण्याची धमकी** दिल्याचे तोंडी व डॉ. रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर प्रकरणी फिर्यादी चे तोंडी रिपोर्ट व मेडीकल रिपोर्ट वरून आरोपी १) नाना ओहाके, २) संपत खोटे दोन्ही रा. चिचोली डांगे ता. आर्वी जिल्हा वर्धा यांचे विरूध्द पोस्टे कोंढाळी येथे कलम ३२४, ५०४, ५०६, ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास सहा. फौजदार दिलीप इंगळे मो.क्र. ९०११११९५२२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण) नागपूर**